परिविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी (भा. प्र. से.) यांच्याकरीता ६ अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी पदे निर्माण करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय, क्रमांकः पदनि-२०१८/प्र. क्र.५०/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ०९ एप्रिल, २०१८.

संदर्भ:-

१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२० फेब्रुवारी, २०१६.
२) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. टीआरएन-१०१८/प्र. क्र.१४९/२०१८/दहा, दि. १७/०३/२०१८.

शासन निर्णय:-

सन २०१७ च्या तुकडीतील परिविक्षाधीन भारतीय प्रशासन सेवेमधील ६ अधिका-यांचे लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी, मसुरी येथील फेझ-१ चे प्रशिक्षण दि.११.०५.२०१८ (म. नं.) रोजी संपुष्टात येत आहे. सदर प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर हे अधिकारी त्यांच्या पुढील जिल्हा प्रशिक्षणाकरिता राज्य शासनाकडे रुजू होत आहेत. सदरहू ६ परिविक्षाधीन भारतीय प्रशासन सेवा अधिका-यांच्या जिल्हा प्रशिक्षणासाठी त्यांची परिविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या जिल्ह्यात पदस्थापना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुषंगाने सदर ६ परिविक्षाधीन भारतीय प्रशासन सेवा अधिका-यांसाठी खाली नमुद केलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयांच्या आस्थापनेवर सहायक जिल्हाधिकारी संवर्गात रुपये १५६००-३९१०० (ग्रेड पे रु. ५४००) या वेतनश्रेणीत पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी प्रत्येकी एक अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी पद निर्माण करण्यास याद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे.-

अ. क्र.	भारतीय प्रशासन सेवेतील परिविक्षाधीन अधिका-याचे नाव	नियुक्तीचा जिल्हा	परिविक्षाधीन कालावधी	
			पासून	पर्यंत
१	श्रीमती भाग्यश्री दिलीप विसपुते	औरंगाबाद	२८.०८.२०१७	२७.०८.२०१९
२	श्री. मनुज जिंदाल	वर्धा	२८.०८.२०१७	२७.०८.२०१९
३	श्रीमती मिताली सेठी	अमरावती	२८.०८.२०१७	२७.०८.२०१९
४	श्री. प्राजित प्रभाकरन नायर	सिंधुदुर्ग	२८.०८.२०१७	२७.०८.२०१९
५	श्री. राहूल गुप्ता	लातूर	२८.०८.२०१७	२७.०८.२०१९
६	श्रीमती वसुमना पंत	पालघर	२८.०८.२०१७	२७.०८.२०१९

२. शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार उपरोक्त अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी यांना महागाई भत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय राहतील.

३. सदर अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी यांच्या पदावर होणारा खर्च " मागणी क्र. सी-१-२०५३ -जिल्हा प्रशासन (००) ०९३ जिल्हा आस्थापना, (०१) सर्वसाधारण आस्थापना (०१)(०१) आयुक्त कोकण (२०५३ ००२८), (०१)(०४) आयुक्त अमरावती (२०५३ ००८२), (०१)(०५) आयुक्त नागपूर (२०५३ ०१०८), (०१)(०६) आयुक्त औरंगाबाद (२०५३ ०१२६) बाब क्र. ०१ वेतन" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येवून मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२० फेब्रुवारी, २०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०४०९१३२९०६५४१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2018.04.09 15:16:18 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. विभागीय आयुक्त, कोकण/औरंगाबाद/ अमरावती व नागपूर.
२. जिल्हाधिकारी, पालघर/ सिंधुदुर्ग/ लातूर/ औरंगाबाद / वर्धा/ अमरावती.
३. जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर/ सिंधुदुर्ग/ लातूर/ औरंगाबाद / वर्धा/ अमरावती.
४. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१/२, मुंबई /नागपूर.
५. अप्पर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई.
६. उप सचिव, कार्यासन १०, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. उप सचिव, वित्तीय सुधारणा-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
८. उप सचिव/ सह सचिव (कार्यासन ब-१ / ई-१) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. निवड नस्ती, कार्यासन ई-८.